Read India
An Imprint of Pratham Books

# लग्नाला जायचंय



रुक्मिणी बॅनर्जी

Original Story (*English*) Going to a Wedding
by Rukmini Banerji
© Pratham Books 2004
Second Marathi Edition: 2010

Illustrations: Santosh Pujari
Marathi Translation: Meera Tendolkar

ISBN: 81-8263-021-5

Registered Office:
PRATHAM BOOKS
633-634, 4th 'C' Main, 6th 'B' Cross,
OMBR Layout, Banaswadi, Bangalore 560 043
✆ +91 80 25420925 / 42052574

Regional Office:
New Delhi ✆ +91 11 41042483

Typesetting and Layout by: Pratham Books, New Delhi

Printed by: Excel Printers Pvt. Ltd., New Delhi

Published by: PRATHAM BOOKS
www.prathambooks.org

The development of this book was sponsored by
Dubai Creek Round Table, Dubai, U.A.E.

Read India
An Imprint of Pratham Books




Some rights reserved. This book is CC-BY-3.0 licensed.
Full terms of use and attribution available at:
http://www.prathambooks.org/cc

# लग्नाला जायचंय

लेखिका
रुक्मिणी बॅनर्जी

चित्रांकन
संतोष पुजारी

मराठी रुपांतर
मीरा तेंडोलकर

माझ्या काकाचे लग्न आहे.
लग्न गावी आहे.
आम्ही सगळे लग्नाला चाललो आहोत.
सगळेजण रेल्वेने गावी जाणार आहोत.


VADODARA


आम्ही स्टेशनवर पोहोचलो.
आम्ही गाडीच्या वेळेच्या खूपच अगोदर गेलो होतो.
माझे बाबा, आई, भाऊ आणि मी.
इथे आमच्याशिवाय कोणीच नव्हते !


VADODARA

आमच्याकडे खूप सामान आहे.
दोन छोट्या बॅगा, एक मोठी बॅग,
आणि एक निळी बॅग.
शिवाय एक पाण्याची लाल बाटली सुद्धा.



गाडी अजून आलेली नाही.
पण आता लोकं येऊ लागली आहेत.
सगळेजण गाडीची वाट बघत आहेत.
पण आमची माणसे कशी नाही आली अजून ?



आले ! ते बघा ! माझे आजोबा.
काठी टेकत चालत येत आहेत.
आम्हाला शोधत आहेत का ते ?
त्यांच्या मागून आजी येते आहे.


VADODARA

''आई ग! मला तहान लागली आहे.
कोल्ड्रिंक मिळाले तर बरे होईल.''
माझ्या भावाला पण भूक लागलेली दिसते.
त्याला बहुतेक वेफर्स हवे असणार.


VADODARA

“थांबा रे !” आई म्हणाली.
“आपण अजून गाडीत चढलेलो सुद्धा नाही.
हे बघ, माझ्याकडे खायला मिठाई
आणि प्यायला पाणी आहे.
पण थोडे थांबलात तर बरे होईल.
गाडी येईलच इतक्यात.”


VADODARA

आजोबांची पिशवी लहान आहे.
यात खाऊ असेल असे वाटत नाही.
आजीची पिशवी मात्र चांगलीच मोठी दिसते आहे.
नक्कीच यात खूप खाऊ असणार.


ADODARA


आत्या आणि काकी पण आले.
जाडी काकी आणि बारीक काका !
त्यांच्याकडे बघताना गंमत वाटते.
दोघेही एकदम टापटीप असतात.


ODARA
VADODARA

आता गर्दी चांगलीच वाढली.
गाडीचा आवाज येऊ लागला.
''गाडी आली, गाडी आली,''
आम्ही नुसता गलका केला.
सगळ्यांना गाडीत चढायची घाई झाली.
''अरे पण नवरा मुलगा कुठे आहे ?''


VADODARA
VADODARA

आम्ही सगळे तयार होतो.
पण काका कुठेच दिसेना.
बाबा काकाला शोधायला गेले.
आजोबा इकडे तिकडे पाहू लागले.
आई काळजीत पडली.
पण आजी नुसतीच हसत होती.



''तो बघा आला,'' आजी म्हणाली.
काका धावत धावतच गाडीत शिरला.
''सॉरी, सॉरी, ओरडू नका.''
काका हसत हसत पुढे आला.
आता आम्ही सगळे गाडीत चढलो होतो.
अखेर गाडी सुरू झाली.



आपण काय केले, कुठे गेलो, याबद्दलचे अनुभव इतरांना सांगायला मुलांना नेहमीच आवडते. **लग्नाला जायचंय** या पुस्तकामध्ये अशाच रंजक गोष्टी आपल्याला मुलांच्याच शब्दात वाचायला मिळतात.

**असे छोट्यांचे मोठे अनुभव याही पुस्तकांमध्ये कथन केले आहेत.**

| | |
|---|---|
| **बाजार** | **चला पुस्तक घ्यायला** |
| **घरी जायचंय** | **माझी बालवाडी** |

आमच्या वेगवेगळ्या भाषांतील शीर्षकांच्या माहितीसाठी
**www.prathambooks.org** ला लॉग ऑन करा

आमची पुस्तके इंग्रजी, हिंदी, मराठी, कानडी, गुजराती, बंगाली, तामिळ, तेलुगु, पंजाबी, उर्दू आणि ओरिया या भाषांमध्ये मिळतात.

**PRATHAM BOOKS**

**प्रथम बुक्स** ही ना-नफा तत्वावर चालणारी संस्था असून, अनेक भारतीय भाषांमध्ये, लहान मुलांसाठी उत्तम दर्जाची पुस्तके परवडतील अशा किंमतीत प्रसिद्ध करते.

Age Group: 3-6 years
Lagnala Jayach (Marathi)
MRP: Rs. 20.00

ISBN 81-8263-021-5
9788182630215